# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०९/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

## मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीस अरोली पोलीसांनी केले अटक

दि. ४/०९/२०२४ रोजीचे ०५:०० वा. ते ५:३० वा. सुमारास मौजा खात आठवडी बाजार येथे फिर्यादी नामे— रामेश्वर कुशन खगारे, वय ३५ वर्षे, रा. देवमुंढरी तह मौदा जि. नागपुर हे आठवडी बाजारात गेले असता व आठवडी बाजार करीत असतांना आठवडी बाजारात फिर्यादीला पाठीमागुन धक्का दिला तेव्हा फिर्यादीने मागे पाहिले व पुढे निघाला असता फिर्यादीच्या शर्टच्या वरील खिशात पोको कंपनीचा अँनराईड मोबाईल किंमती अंदाजे ८०००/रु चा मोबाईल दिसुन आला नाही तेव्हा फिर्यादी बाजारातील आजुबाजुला लोकांना फिर्यादीने मोबाईल बाबत विचारणा केली व फिर्यादीचा नातेवाईक निखील मेश्राम यांचे मोबाईल वरुन कॉल केला असता फिर्यादी मोबाईल स्वीच ऑफ दाखवित होता फिर्यादी पोको कंपनीचा अँनराईड मोबाईल आठवडी बाजारात गर्दीचा फायदा घेवुन कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेला आहे. अशा अज्ञात इसमाविरूद्ध पोस्टे अरोली येथे कलम ३०३ (२) बीएनएस अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध पोस्टे अरोली येथील तपास पथक घेत असता मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, सदर गुन्हयातील आरोपी हा खात रेल्वे स्टेशन परीसरात संशयितरीत्या फिरत असल्याची माहिती मिळाल्याने नमुद घटनास्थळी सापळा रचुन **आरोपी नामे— अजयप्रसाद साहु वय ३० वर्ष, रा. महाराजपुर बजार जि. साहेबगंज झारखंड** यास ताब्यात घेतले. आरोपीस विचारपुस दरम्यान आरोपीने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीकडुन पोको कंपनीचा अँनराईड मोबाईल किंमती अंदाजे ८०००/—रु जप्त केला.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली येथील ठाणेदार सपोनि स्नेहल राउत, पोहवा शाम पोकळे, संदीप बाजनघाटे, पोअं. विकी कोसरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर